# आठवणीतल्या गाण्यांची खजिनदार



**लेखिका: डॉ. विनता कुलकर्णी (शिकागो)**
**http://www.vinata-kulkarni.com/**

**.....................................................**

२७ फेब्रुवारी हा कविवर्य कुसुमाग्रजांचा जन्मदिवस मराठी भाषा दिवस' म्हणून जगभर साजरा होतो. कुसुमाग्रजांची अनेक पुस्तके माझ्या संग्रही आहेत. पण ही आठवण त्यापूर्वीची. एके दिवशी काही कारणाने, कुसुमाग्रजांच्या एका कवितेतील पंक्ती आठवल्या...

'नवलाख तळपती दीप विजेचे येथ
उतरली तारकांदळे जणू नगरात
परि स्मरते आणिक करते व्याकुळ केव्हा
त्या माजघरातिल मंद दिव्याची वात!'...

यापुढचे काही शब्द, नीट ध्यानात नव्हते, म्हणून मी इंटरनेटवर शोधू लागले आणि हीच कविता नव्हे तर, अनेक मराठी गीतांचा शब्दबध्द खजिनाच मला सापडला, 'आठवणीतली गाणी' या संकेतस्थळावर! वेबसाइट- **http://www.aathavanitli-gani.com/).** त्यानंतर ह्या बेबसाइटला मी अनेकदा भेट दिली. ह्या वेबसाइटची देखभाल कोण बरं करत असावं, असा प्रश्नही कित्येकदा, मनांत येई. पण तेव्हा वेबसाइटवर त्याबद्दल माहिती नव्हती. माझ्या ह्या प्रश्नाचं उत्तर नंतर सापडलं. आठवणीतली गाणी ह्या विना-नफातत्त्वावरील संकेतस्थळाची निर्माती, व्यवस्थापिका, आणि सर्वेसर्वा व्यक्ती आहे **अलका विभास.**



मी शिकागोहून, दुबई येथे अलका विभासला फोन लावला, आणि पहिल्याच संभाषणात एकेरी संबोधण्या-इतपत आमची तार जुळली.

अलकाच्या मते, आठवणीतली गाणी ह्या संकेतस्थळाच्या केंद्रस्थानी आहे, मराठी भाषा! अलका सांगते, विंदा करंदीकर म्हणायचे- एका वेळेस कमीत कमी दोन तरी कामे करावीत. हा दृष्टिकोन मी कळायला लागल्यापासून अंगिकारला होता. तिचे शाळा, कॉलेजचे शिक्षण भारतात वेगवेगळ्या गांवी झाले. त्यानंतर तिने काही वर्षे भारतात महाविद्यालयामधे गणित व संख्याशास्त्र विषयाची प्राध्यापकी आणि संगणकशास्त्रातील Oracle, ASP विषयांचे व्यावसायिकांना प्रशिक्षणही दिले. प्राध्यापकी पेशामुळे सतत सळसळत्या तरुणाईशी अलकाचा संबंध येत होता. भारतातील हे vibrant विश्व सोडून, ती २००० साली, पतीसमवेत, दुबई (युनाटेड अरब एमिरेट्स) येथे स्थलांतरित झाली. आणि मग तिला वेगळ्या जीवनशैलीला सामोरे जावे लागले. पहिल्यांदाच रिकामा वेळ हाती आला. अर्थार्जनापलिकडे जाऊन काही सक्रिय करावे ह्या उद्देशाने तिने Make-A -Wish Foundation ह्या संस्थेत पाच वर्षे काम केले.

एकीकडे अलकाचे, पेन्सिल स्केचिंग, क्रोशे- विणकाम, लेखन (Blog- Coffee Break- http://itsmealka.blogspot.com/) हे छंद जोपासणे चालू होते. शिवाय मराठी गाण्यांची अतिशय आवड. जोडीला घरी मराठी भाषेचे बाळकडूही लाभलेले. ह्या पार्श्वभूमीवर मग अलकाने, स्वत:पुरता मराठी गाणी, त्यांचे शब्द, संबंधित माहिती ह्यांचा एक संग्रह, संगणकीय डाटाबेस-स्वरूपात तयार करण्याचे ठरवले. सुरुवातीला त्यात सुमारे २५० गाणी समाविष्ट केली. ह्या संग्रहाचे प्राथमिक स्वरूप तयार झाल्यावर, जगभर पसरलेल्या आपल्या आप्तजनांना दाखवण्याच्या उद्देशाने, अलकाने त्याचे एका छोट्या संकेतस्थळामधे (आठवणीतली गाणी) रूपांतर केलं, १५ मे २००३ रोजी! स्वत: संगणकशास्त्राची प्रशिक्षक असल्याने स्वत:च वेबसाइटनिर्मिती, व्यवस्थापन करणं अलकाला अवघड गेलं नाही.

आठवणीतली गाणी ह्या वेबसाइटला मराठीगीतप्रेमींकडून प्रतिसाद मिळू लागला. गल्फ न्यूज ह्या दुबईतील वृत्तपत्रानेही त्याची दखल घेतली. आणि मग वेबसाइटला झपाट्यानं प्रसिध्दी मिळाली. अलका सांगते-प्रोत्साहन, कौतुकाचा वर्षाव, वेबसाइटवर अजून कुठली गाणी, त्याबद्दल माहिती, अन् काय काय असावे, असं सारं कळवणारा, ईमेल्सचा धबधबा अंगावर आला, आणि पहिल्यांदाच आपण काय हातात घेतलं आहे या जबाबदारीची जाणीव झाली. पुढचे पाऊल पुढेच टाका ह्यानुसार, वेबसाइटची वाढ झाली.

आठवणीतल्या गाण्यांची निवड करतांना, एखाद्या गाण्याची चाल, किंवा गायक/गायिकेचा लागलेला खास स्वर, त्या गाण्यातील शब्द, कधी चित्रपटातील त्या गाण्याशी निगडीत असलेला प्रसंग, गाण्यातील वाद्यमेळ, राग, संगीतकाराने बांधलेली जागा, एखाद्या चालीवर आपसूक थिरकणारे आपले पाय, असे अनेक निकष आहेत. मुख्य म्हणजे, मराठी भाषा ही इथे नायिका आहे. मराठी भाषेतील गाण्यांच्या शब्दांना (न्ह्य्च्ल्) इथे अधिक महत्त्व आहे.

सतत बदलणारी इंटरनेट टेक्नॉलॉजी शिकणे, वेबसाइटनिमित्ताने जनसंपर्क, वेबसाइटसाठी, गाणी ऐकणे, निवडणे, संबधित माहिती गोळा करणे त्यांचे टंकलेखन, एक ना दोन...अशी अनेक कामे अलका करत असते. प्रत्येक गाण्याच्या खाली, क्रेडिट्समधे, संबंधित व्यक्तींची नावे परिश्रमपूर्वक शोधून काढून नमूद करण्याबाबत ती जागरुक असते. त्यामुळे कलाकारांना, त्यांच्या वारसदारांनाही समाधान वाटते. काहींनी संपर्क करून अनेक चांगली गाणी, संबंधित छायाचित्रे, रचनाकारांच्या जन्म, मृत्यूच्या तारखा तिच्याकडे पाठविल्या आहेत. हे वेबसाइटचे काम करतांना अलकाला अनेक हृद्य अनुभव आले आहेत. गीतकार वा. रा. कांत यांच्या नातीने, (मुलीच्या मुलीने) त्यांचा फोटो पाठवला, आणि वेबसाइटवर असे त्यांचे सर्व काम एकत्र, त्यांच्या नावाच्या पानावर पाहून आईस किती धन्य वाटले व भरून आले, हे आवर्जून सांगितले.

संगीतकार वीरधवल करंगुटकर यांचं ७ जानेवारी, २०१३ रोजी निधन झालं, त्यानंतर अलिकडेच त्यांच्या मुलीने, अलकाला ही बातमी आणि त्यांचा फोटो वेबसाइटसाठी पाठवला. अलका सांगते, ह्या वेबसाइटच्या कामात त्रासदायक असे अनुभव नाही आले. मात्र एक अतिशय उत्स्फूर्त पण तितकाच गमतीदार feedback, किमान ८-१० वेळा आला आहे. टोकाचा नोस्टाल्जिआ, भावनेच्या भरात, दुसरे काय म्हणावे हे न सुचल्याने असेल कदाचित लिहिलेलं... काय बोलायचे... फक्त, / love you....

वैयक्तिक आवड म्हणून, आणि शाळा/कॉलेजेसमधील, दूरदर्शन वाहिन्यांवरील संगीतस्पर्धा, reality shows साठी, जगभरातील अनेकजण आठवणीतली गाणी संकेतस्थळाचा वापर करतात. भारतातले एक ९० वर्षांचे आजोबा आणि ८६ वर्षांच्या आजी यांना आलेली अडचण, अलकाने ओळख नसताना सुद्धा फोनवरून सोडवून दिली होती. महाराष्ट्र-राज्य-मंत्रीमंडळातील महत्त्वाचा कार्यभाग सांभाळणारी व्यक्ती, विख्यात वैज्ञानिक आणि विविध क्षेत्रातील अनेकजण रोज रात्री आठवणीतली गाणी unwind होण्यासाठी वापरतात. अगदी हाच अनुभव, नेमक्या ह्याच शब्दांत अनेकांच्या सांगण्यात येतो. काही विदेशी नागरिक जे मराठी भाषा विदेशी विद्यापीठांमधे शिकतात, त्यांच्यासाठीही आठवणीतली गाणी हे उपयुक्त संकेतस्थळ होऊ लागलं आहे.

आठवणीतली गाणीचे स्वत:चे फेसबुकवर आणि ट्विटरवर पान असून तिथे दर आठवड्याला दोन गाण्यांना प्रकाशझोतात आणले जाते. काही वेळा अशी गाणी नैमित्तिक असतात. जसे अलिकडे झालेल्या दिल्लीतील सामूहिक बलात्काराच्या दुर्घटनेनंतर, "अंधार वेदनांनी आक्रंदतो तरीही, नजरेत वासनेचा शृंगार पाहिला मी, त्या कोवळ्या फुलांचा...", मंगेश पाडगावकरांना पद्मविभूषण मिळाले तेव्हा त्यांचे जाहल्या काही चुका, अन् सूर काही राहिले .. ही गाणी.

कुठल्याही स्पर्धेत ही वेबसाइट नाही. मात्र, दिवसेंदिवस अनेक नवीन आणि तांत्रिक गोष्टींची ह्या वेबसाइटवर भर पडत आहे. सर्च सुविधा सुरू करण्याचा, संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या पर्यायांशी निगडीत माहिती देण्याचा विचार चालू आहे. उदाहरणार्थ- समईच्या शुभ्र कळ्या या गाण्याचा अर्थ सांगा किंवा काही गाण्यांविषयीच्या प्रचलित रंजक कथा खऱ्या का? असे अनेक प्रश्न अलकाला विचारले जातात. तिच्या मते, ह्यावर बोलण्याचा अधिकार प्रथमत: खुद्द कवीचा अथवा या क्षेत्रात ठोस काम केलेल्या व्यक्तींचा आहे. त्यामुळे काही मान्यवरांशी संपर्क साधून त्यांच्या ब्लॉगच्या स्वरूपात हे विवरण उपलब्ध करून देण्याचे विचाराधीन आहे. गाण्यांचे अर्थ विचारणाऱ्यांसाठी transliterated lyrics, मराठी गझला आणि अन्य काही विभाग येण्याच्या मार्गावर आहेत.

गाण्यांची स्वरलिपी (notation), ताल, गीतांचे मात्राबध्दवृत्तानुसार वर्गीकरण इत्यादी सांगीतिक दिशेने किंवा साहित्यिक दिशेने खूप खोलात माहिती देणे हा सध्या तरी ह्या संकेतस्थळाचा आवाका नाही. कदाचित् भविष्यात त्यादृष्टीनेही विचार केल्या जाईल.

आता आठवणीतली गाणी हे केवळ संकेतस्थळ राहिलं नाही. आणि फक्त अलकापुरतं ते मर्यादित राहिलेलं नाही. तिला येणाऱ्या प्रतिक्रियांमधे आवर्जून दोन गोष्टींचा उल्लेख होतो. एक, ही आता सांगीतिक चळवळ झाली आहे. आणि दुसरे, प्रत्येकाला ती आपली वेबसाइट वाटते. त्यामुळे वेबसाइटच्या दृष्य स्वरूपात आणि वापरण्याच्या पध्दतीत कुठलाही बदल करताना अलकाला, वय वर्षे १५ ते ९० हा गट सतत विचारात घ्यावा लागतो.

सुमारे दहा वर्षांपूर्वी २५० गाण्यांनी सुरुवात केलेल्या, 'आठवणीतली गाणी' ह्या विना नफा तत्त्वावरील संकेतस्थळावर, मार्च ५, २०१४ च्या नोंदीनुसार, **२,९२५** गाणी आहेत. दररोज, जवळपास २५ देशातून ३,५०० लोक ३०,००० हून अधिक गाणी येथे ऐकतात. आणि ही संख्या वाढतच जाणार ह्यात शंका नाही. या संकेतस्थळाच्या आजवर सुमारे ३८.५ लाख (३,८५३,८९८) लोकांनी भेट दिली असून फेसबुकवर चाहत्यांची

संख्या (१०१,३४७) थोडक्यात, १ लक्ष ओलांडली आहे.

( check, Facebook - www.facebook.com/aathavanitli.gani, on Twitter www.twitter.com/AthavanitliGani )

असं म्हणतात, की गाण्याच्या माध्यमातून, संस्मरण/नोस्टाल्जिआ हे मेंदूच्या कार्यपेशींच्या सहज कृतीपेक्षाही कित्येकदा प्रभावी ठरते. सुसंस्कृत आणि संवेदनशील मनांत गाण्यातील शब्दांना खास स्थान असते. तेव्हा, अलका विभास निर्मित, **http://aathavanitli-gani.com/** हे संकेतस्थळ म्हणजे जगभरातील मराठीप्रेमींसाठी, आपल्या अंतरीची तार छेडणारे एक आनंदनिधान, आणि सध्याच्या इलेक्ट्रॉनिक गॅजेट्सच्या भाषेत बोलायचे तर **Cultural Touchstone** आहे!

***

(पूर्वप्रसिध्दी: बृन्महाराष्ट्र वृत्त, उत्तर अमेरिका, मार्च २०१३)